
|| Shri Gajanan Seva ||

श्री गजानन सेवा

सॅन-फ्रान्सिस्को बे एरिया, कॅलिफोर्निया, अमेरिका


श्री गजानन सेवा ही अमेरिकेतील नोंदणीकृत सेवाभावी 501(c)(3) संस्था आहे.




# श्री गजानन सेवा - वृत्तपत्रिका
# जून २०२६

## Shri Gajanan Seva, Bay Area California

**Address: 2350 Paragon Drive**
**San Jose, California 95131**
**Website:** https://shrigajananseva.org
**Email: info@shrigajananseva.org**



# श्री गजानन महाराज गुरुपौर्णिमा उत्सव २०२६

# आले गुरुराजे!

सद्गुरूंचे जीवनातील स्थान हे सर्वोच्च आहे. 'गुरुविण कोण दाखवील वाट' असे आपल्याकडे म्हटले जाते. राष्ट्रसंत तुकडोजी महाराज यांनी आपल्या "आले गुरुराजे..." या अमर रचनेतून गुरूंच्या आगमनाचा आणि अंतःकरणाच्या शुद्धतेचा जो महिमा गायला आहे, तो आज आपल्या मंदिराच्या संदर्भात तंतोतंत खरा ठरत आहे.

आज आपल्या लाडक्या मंदिरात साक्षात शेगावचे श्री गजानन महाराज मूर्ती रूपात विराजमान आहेत. ते केवळ एक पाषाणाची मूर्ती नसून, आपल्या सर्वांचे रक्षण करणारे साक्षात चैतन्य रूप आहे. अशा या सद्गुरूंच्या पूजनाची आणि सेवेची सुवर्णसंधी आपल्याला लाभली आहे. परंतु, केवळ मंदिरात येणे पुरेसे आहे का? यावर अंतर्मुख होऊन विचार करण्याची हीच ती वेळ आहे.

**पुष्पे वाहिन मी भावाची, घालीन माळ जीवाची।**

**गुरूच्या हृदयाची, प्रेमाची, ऊटी वाहिन गंधाची ॥**

मंदिरात जाणे, दर्शन घेणे हे महत्त्वाचे नक्कीच आहे, पण तेवढेच पुरेसे नाही. महाराजांना बाह्य उपचारांपेक्षा 'भावाची' पुष्पे हवी आहेत. आपण मंदिरात करत असलेले वाचन, ग्रंथांचे पारायण आणि नामाचा जप (मंत्रजप) आपल्यामध्ये आतून-बाहेरून बदल घडवून आणणारा असावा. जोपर्यंत या गोष्टींमुळे आपल्या स्वभावात बदल होत नाही आणि आपण एक उत्तम व्यक्ती बनत नाही, तोपर्यंत ती भक्ती अपूर्णच राहते.

**नंदादीप जळे भक्तीचा, तारण तुटतो त्याचा।**

**लागे ओलावा ज्ञानाचा, पाझर वैराग्याचा ॥**

लवकरच गुरुपौर्णिमेचा पावन उत्सव येत आहे. या निमित्ताने आपण एक महत्त्वाचा संकल्प केला पाहिजे. तो म्हणजे महाराजांनी घालून दिलेल्या तत्त्वांचे आपल्या दैनंदिन जीवनात आचरण करणे. कुटुंबात वागताना संयम, प्रेम आणि आदर असावा. कामाच्या ठिकाणी प्रामाणिकपणा, कर्तव्यदक्षता आणि सहकाऱ्यांशी आदराची भावना असणे हीच खरी सेवा आहे. समाजात कोणाशीही भेदभावाची भिंत न ठेवता सर्वांशी आपुलकीने वागणे.

कामावर आणि समाजात असावे.

**मानस मंदिर हे सुंदरसे, दारी गोधन सरसे।**

**दया क्षमा शांती अति सुरसे, मोहित होती सुरसे ॥**

गुरू कुठे येतात? जिथे 'दया, क्षमा आणि शांती' वास करते. आपले मंदिर हे असेच एक पवित्र स्थान आहे. पण हे मंदिर सुंदर आणि सुव्यवस्थित ठेवण्याची जबाबदारी आपली आहे. गुरुपौर्णिमेला आणि वर्षभर मंदिरामध्ये विविध प्रकारच्या स्वयंसेवेची (Volunteering) आवश्यकता असते. महाप्रसाद वाटप, स्वच्छता सेवा, मंदिर व्यवस्थापन आणि येणाऱ्या भक्तांची काळजी घेणे, हीच खऱ्या अर्थाने गजानन महाराजांची सेवा आहे.

**सिंहासनी रमता हृदयाच्या, द्वादश कमलदलांच्या।**

**वाजती चौघड्या श्रद्धेच्या, सोहम ध्वनी नादाच्या ॥**

महाराजांची सेवा केवळ गुरुपौर्णिमेपुरती किंवा मंदिराच्या चार भिंतींच्या आत मर्यादित न राहता, वर्षभर आपल्या संपूर्ण आयुष्यात चालली पाहिजे. जेव्हा आपण निष्ठेने ही सेवा करतो आणि आपल्या वागण्यातून इतरांना सुख देतो, तेव्हा आपल्या हृदयाच्या सिंहासनावर गजानन महाराज कायमचे स्थिरावतात. तिथे मग 'सोऽहम्' नादाचा जयघोष अखंड सुरू राहतो.

**तुकड्या दास म्हणे नि:संगी, मन हे निर्भय रंगी।**

**गुरूच्या दरबारी सत्संगी, ब्रह्मानंद अभंगी ॥**

जो गुरूंच्या विचारांचे बोट धरून चालतो, त्याचे मन पूर्णपणे 'निर्भय' होते. ज्याच्या आचरणात शुद्धता आहे, त्याच्या पाठीवर गजानन महाराजांचा आशीर्वाद नेहमीच असतो. अशा पावन दरबारात आणि सात्विक जीवनात मिळणारा आनंद हा 'ब्रह्मानंद' असतो.

"**आले गुरुराजे पाहाण्यासी, निर्मळ मंदिर माझे**" चला तर, आपल्या मंदिरात मूर्ती रूपाने उपस्थित असलेल्या श्री गजानन महाराजांच्या स्वागतासाठी आपले मन आणि आचरण दोन्ही शुद्ध करूया. येणाऱ्या गुरुपौर्णिमेला आणि वर्षभरातील विविध सेवांमध्ये स्वयंसेवक (Volunteer) म्हणून मोठ्या संख्येने सहभागी व्हा आणि आपल्या कृतीतून महाराजांना अभिप्रेत असलेले उत्तम नागरिक व भक्त बना.

**श्री गजानन महाराज गुरुपौर्णिमा उत्सव २०२६**
**दिनांक : शनिवार, १ ऑगस्ट २०२६**
**वेळ : दुपारी ४.०० ते रात्री १०.३० वाजेपर्यन्त**
**स्थळ: श्री गजानन सेवा केंद्र, सॅन होजे**
**RSVP:** https://tinyurl.com/GuruPournima2026

**॥ गण गण गणात बोते ॥**




# अटळ प्रारब्ध

**"होणारे न चुके कदापिही, जरी ब्रह्म तया आडवा"** हे वाक्य सर्वांना नक्कीच परिचित आहे. या ना त्या कारणाने प्रत्येक जण कमी-अधिक स्वरूपात नेहमीच त्याचा प्रत्यक्ष अनुभव घेत असतो. आपण कितीही डोके आपटले वा प्रयत्नांची पराकाष्ठा केली, तरी होणारे ते होणारच आहे. मग आपली इच्छा असो वा नसो, हे तर ब्रह्मवाक्यच आहे, म्हणा ना. त्यापासून कोणाची कधी सुटका होत नसते. त्याचा प्रत्येकाने थंड डोक्याने विचार करून योग्य ती कृती केली, तर कोणाच्याही वाट्याला दुःख येणार नाही; पण प्रत्यक्षात तसे होत नाही, हे देखील तितकेच खरे

या विषयाचा विचार करीत असताना आमच्या गावी अशी एक घटना घडली. आमच्या गावातील सुप्रसिद्ध श्रीराम मंदिरात दास नवमी उत्सवानिमित्त गडावरील एका रामदासी सेवेकऱ्याची विविध विषयांवरील प्रवचने व विचारसत्रे सुरू होती. प्रत्येक दिवशी कार्यक्रम संपल्यानंतर श्रोत्यांनी विचारलेल्या प्रश्नांची बुवा समाधानकारक उत्तरेही देत होते.

प्रवचनाच्या सातव्या रात्री एका त्रस्त चेहऱ्याच्या व्यक्तीने बुवांना विचारले, “आजचे तुमचे प्रवचन मला काही पटलेले नाही; कारण माझ्या आयुष्यातील वास्तव चांगलेच वेगळे आहे आणि ते मी स्वतः भोगत आहे. मी माझ्या जीवनात अत्यंत सदाचाराने, प्रेमाने, आपुलकीने, सत्याने व सहकार्याने वागत राहिलो; तरी माझ्या वाट्याला सतत दुःखाचीच मालिका चालत आलेली आहे. सुख तर मला माहीतच नाही. हे असे का व्हावे? गंमत अशी की समोरचे राजाभाऊ आजपर्यंत माझ्या अगदी उलट वागूनही अगदी मजेत आहेत. हे असे का? राजाभाऊंचे वास्तव इतके वेगळे का असावे? देवाच्या दारात इतकी तफावत का असावी?”

रामदासी म्हणाले, “हे पाहा, बळवंतराव, हे प्रत्येकाच्या प्रारब्धानुसार घडत असते. या विषयानेच आपल्या प्रवचनसत्राचा समारोप करूया, म्हणजे सर्वांचेच समाधान होईल. तसे मी आयोजकांच्या कानावर ही गोष्ट घालतो. मग ठरले तर.” आज प्रवचनसत्राचा अखेरचा दिवस असल्याने सारे सभागृह श्रोत्यांनी तुडुंब भरले होते. ध्वनी-प्रकाश योजना आयोजकांनी उत्तम ठेवली होती. अगदी पहिल्या रांगेत बळवंतराव पेन-वही घेऊन बसले होते. ते अभ्यासात हुशार होते; पण परिस्थितीने वैतागलेले होते. इतकेच.

समारोपाच्या दिवशी बुवा आपल्या प्रभावी, अनुभवी वाणीत बोलू लागले, “प्रारब्ध, कर्म, दैवगती, कर्मगती, प्राक्तन, डेस्टिनी इत्यादी व्यवहारात नित्य बोलले जाणारे शब्द जरी अनेक असले, तरी त्यांचा अर्थ एकच आहे.

**१. ‘करावे तसे भरावे.’**
**२. ‘पेरावे तसे उगवते.’**

ही व अशी अनेक वाक्ये वापरात असली, तरी त्यांच्या अर्थाचा गोषवारा एकच आहे, हे नक्की. याच अनुषंगाने समर्थ रामदासस्वामींनी आपल्या मनाच्या श्लोकांत हीच गोष्ट सांगितली आहे. सुखदुःखाविषयी बोलत असताना त्यांनी ती उलगडून दाखविली आहे. ते म्हणतात,

**‘जगी सर्व सुखी असा कोण आहे?**
**विचारी मना तूचि शोधूनी पाहे,**
**मना त्वाचि रे, पूर्वसंचित केले,**
**तयासारिखे भोगणे प्राप्त झाले’**

आपले जसे कर्म असेल, त्यानुसार भोग भोगावे लागतात. हे स्वामींचे बोल म्हणजेच कर्मयोग व प्रारब्ध या संकल्पनांची त्यांनी केलेली सहज-सोपी उकल होय. त्यातूनच सुख-दुःख या

सुख सर्वांनाच आवडते; मात्र दुःख कोणालाच आवडत नाही. दुःख खूप मोठे असून सुख मात्र अगदी थोडेसेच असते. पण माणूस अल्पशा सुखप्राप्तीसाठी दुःखाचे डोंगर सहज उपसतो. सुखाची पहाट पाहण्यासाठी, म्हणजेच उषःकालासाठी, तो दुःखाची रात्र मोठ्या कष्टांनी काढीत असतो. संत तुकारामांनी म्हटलेच आहे, '**सुख असे जवा एवढे, तर दुःख पर्वता एवढे**.'

या संकल्पनेतूनच सुखी, प्रसन्न जीवनासाठी एकच महामंत्र सांगितला आहे. तो म्हणजे सुखाने हुरळून न जाता व दुःखाने होरपळून न जाता त्यामध्ये सुवर्णमध्य काढावा व त्यानुसार वागावे. भगवद्गीतेत तर हीच गोष्ट सांगितली आहे: '**सुख-दुःख समे कृत्वा...**'

## कर्मफलाचा सिद्धांत

आपल्या जीवनात आपल्याकडून जसे कर्म घडते, तसे त्याचे फळ भोगावेच लागते, मग ते कोणतेही असो. "कर्म तसे फळ" हा कर्मफल सिद्धांत आहे. उदाहरणार्थ, न्यूटनचा गतीविषयक तिसरा नियम, प्रत्येक क्रियेला प्रतिक्रिया असतेच. Actions and reactions are equal and opposite.

हा कर्मसिद्धांत आपल्या अध्यात्मात केव्हाच सांगितला गेला आहे. त्यातूनच पुनर्जन्म, प्रारब्ध, प्राक्तन आदी दैवादी गोष्टी परंपरेने आपल्यात चालत आल्या आहेत. त्यानुसार कर्माप्रमाणे चांगली-वाईट फळे आपल्याला भोगावीच लागतात. प्रचलित काळात एखादी भ्रष्टाचारी व्यक्ती भ्रष्ट मार्गाने न्यायालयात होणाऱ्या शिक्षेपासून एकवेळ आपली सुटका करून घेऊ शकेल; पण यमदरबारी ते कधीच शक्य होणार नाही. चित्रगुप्ताच्या नोंदीनुसार आपल्या जीवनातील नित्यकर्मांवरून मृत्यूनंतर आपल्याला स्वर्ग की नरकप्राप्ती ठरत असते. त्यात कोणतीही दया, माया किंवा सूट हा प्रकार नसतो. उदाहरणार्थ, गरुड पुराण.

जीवनात आपण कमी-अधिक स्वरूपाची बरीच कर्मे करीत असतो. ते स्वाभाविकदेखील आहे. उदाहरणार्थ, भूक लागल्यावर अन्नग्रहण करणे, बीज जमिनीत पडल्यावर पीकनिर्मिती होणे, अभ्यास करून परीक्षा देणे, टाळी वाजविल्यावर त्वरित झिणझिण्या येणे, अनैतिक गोष्टी करणे इत्यादींना क्रियमाण कर्मे म्हणतात.

सत्कर्म व दुष्कर्म यांचा हिशोब घेऊनच जीव पुढील जन्म घेतो व मरतोही. जीव सोडताना पुन्हा भल्या-बुऱ्या कर्मांचा हिशोब घेतला जातो. उदाहरणार्थ, बँक खाते दरवर्षी प्रारंभ व समाप्त होताना शिल्लक रक्कम पुढे सरकते; तसेच खात्यातील उरलेल्या शिलकीनुसारच तो पुढील व्यवहार करू शकतो. त्यासाठीच तो सदैव जागरूक असावा लागतो.

संतांनी आपले ईश्वरकार्य करीत असताना सुख-दुःख इत्यादींची कधीच पर्वा न करता आपले कार्यच करीत राहिले. संत कबीर यांचा प्रसिद्ध दोहा हेच सांगतो,

प्रत्येक जन्मात उत्तमोत्तम कर्म केले व सत्कर्म वाढत गेले, तर त्याचे फलित म्हणून प्रत्यक्ष ईश्वरी लाभ होतो. उदाहरणार्थ, संत रामदासस्वामी, संत नामदेव महाराज.

प्रारब्ध अटळ असले, तरी खऱ्या अर्थाने ते समजून घेऊन आनंदी मानसिक स्थितीत राहिल्यास आपले दुःख खचितच सुसह्य करू शकतो. आनंदाची परमोच्च स्थिती गाठू शकतो. प्रारब्धाच्या विचाराने मन निराश होऊ नये. **श्री गजानन महाराजांच्या कृपेचा खरा अर्थ म्हणजे संकटाच्या वेळी श्रद्धा, धैर्य आणि नामस्मरण यांचा आधार न सोडणे.** जीवनात सुख-दुःख येत राहतात; परंतु प्रत्येक प्रसंगात आपले कर्तव्य प्रामाणिकपणे करणे, मनात कोणाबद्दल कटुता न ठेवणे, सेवा व सदाचाराचा मार्ग धरून राहणे, हाच भक्तीचा खरा मार्ग आहे. महाराजांच्या चरणी विश्वास ठेवून वर्तमानातील कर्म शुद्ध ठेवले, तर मनाला शांतता मिळते आणि दुःख सहन करण्याची शक्तीही प्राप्त होते. **“मी गेलो ऐसे मानू नका, भक्तीत अंतर करू नका”** हा त्यांचा आश्वासक संदेश भक्ताला सदैव धीर देतो.

- महाराजांचे एक भक्त



## श्री गजानन सेवा नामस्मरण जून २०२६








## Temple Initiative

तुम्ही सर्व जाणताच की श्री गजानन सेवा या संस्थेने आता Temple initiative सुरू केला आहे , त्यामुळे जास्तीस जास्त लोकांनी या उपक्रमात सहभागी व्हा आणि वेबसाईट वरील Google Form भरा

https://shrigajananseva.org/shri-gajanan-seva-donation-form/

# श्री गजानन सेवा कार्यक्रम

## श्रृंगार सेवा आणि आरती

अतिशय भावपूर्ण वातावरणात श्री. महाराजांचा श्रृंगार प्रत्येक गुरुवारी सकाळी ७.०० ते ९.०० ह्या वेळेत केला जातो. आपणास सहभागी व्हायचे असेल तर कृपया आम्हाला संपर्क करावा

## श्री गजानन विजय ग्रंथ पारायण सेवा

श्री गजानन विजय ग्रंथाची पारायण सेवा गेले कित्येक महिने सुरु आहे. दर गुरुवारी भक्तांना श्री गजानन विजय ग्रंथातील एक अध्याय पारायणासाठी देण्यात येतो. भक्त आपल्या सोयीनुसार त्याचे पारायण करतात. भाषेचे किंवा वेळेचे बंधन नाही. अशा रीतीने प्रत्येक भक्ताचे २१ गुरुवार मिळून एक पारायण पूर्ण होते. आपणास सहभागी व्हायचे असेल तर कृपया आम्हाला संपर्क करावा.

### दैनंदिन नाम जप

श्री गजानन सेवा संस्थेतर्फे - दैनंदिन नामजप सेवा आयोजित करण्यात येते. रोज सायंकाळी ७.०० ते ७.२५ ह्या वेळेत आधी 'गण गणगणांत बोते' नामजप, त्यानंतर श्री. राम रक्षास्तोत्र आणि मग श्री. मारुतीस्तोत्र अशी सेवेची रूपरेषा असते. ही आभासिक पद्धतीची सेवा असते (ऑनलाईन).

अधिक माहिती माहितीसाठी कृपया येथे भेट द्या: https://shrigajananseva.org/
संस्थेच्या सेवा कार्यात मदत करण्यास इच्छुक असल्यास ,
कृपया info@shrigajananseva.org या ईमेल वर संपर्क करा..



Subscribe | Past Issues | Translate

Want to change how you receive these emails?
You can update your preferences or unsubscribe from this list.

INTUIT mailchimp